Historicity Research Journal
Volume 1 | Issue 6 | Feb 2015 ISSN:- 2393-8900

**Research Article**

# श्री संत दामाजी पंत यांचे चरित्र : एक अभ्यास

**शितल अशोक फुगारे**

इतिहास विभागप्रमुख , श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.

***सारांश* :**

मंगळवेढा या ऐतिहासीक स्थळास अध्यात्मिक व ऐतिहासिक परंपरा फार मोठी आहे. या ऐतिहासीक स्थळास अनेक संत सज्जनांचा सहवास लाभला आहे. परंतू हे ऐतिहासीक स्थळ प्रामुख्याने दामाजीपंताचे मंगळवेढे म्हणूनच ओळखले जाते. या महान संताच्या तत्वज्ञानाचा व शिकवणूकीचा प्रसार होणे, सदयस्थितीतही आवश्यक आहे, नव्हे ती एक काळाची गरजच आहे. प्रामुख्याने याच हेतूने मंगळवेढे येथे दामाजी संस्थेची स्थापना १९४४ साली झाली.

***प्रस्तावना* :**

शहरात प्रवेश करताना दोन्ही ता जोडून हसत मुखाने स्वागत करणारी ही मुर्ती आपले लक्ष वेधून घेते. ती आहे श्री संत दामाजी पंत यांची, ‘अतिथी देवो भव’ चा संदेश आपणास पहावयास मिळतो. सन १४५० पासून देत आहे. मंगळवेढा हा सर्व संतापेक्षा श्री दामाजीपंताचा मंगळवेढा म्हणून प्रसिध्द आहे. त्यांचेच नावाने ही नगरी ओळखली जाते.

इ.स. १९६० साली श्रीसंत दामाजीपंत महाराज यांचे चरित्राची प्रथम आवृत्ती प्रसिध्द केली. श्री संत दामाजी पंत यांचा काल कोणता याबद्दलही आतांपर्यंत प्रसिध्द झालेल्या वाङ्‌मयात एकवाक्यता नव्हती. म्हणून त्याबद्दल संशोधन केल्यानंतर कर्नल एथेरिज यांनी हिंदुस्थानातील दुष्काळ हे पुस्तक प्रसिध्द केले. त्यात इ.स. १४५८ ते १४६० हाच दामाजीचा दुष्काळ म्हणून जो सन दिला आहे. बॉम्बे गॅझेटियरमध्येही हीच दुष्काळाची वर्षे म्हणून दिली आहे. श्री संत दामाजी महाराज यांचा निर्वाणदिन वैशाख पोर्णिमा असून दरवर्षी या दिवशी मंगळवेढे येथे त्यांची पुण्यतिथी साजरी केली जाते.

**उद्दिष्टये :-**

१) श्री संत दामाजी जीवनकार्य जाणून घेणे.
२) श्री संत दामाजीचे सामाजिक कार्ये यावर प्रकाश टाकणे.
३) श्री संत दामाजीपंताच्या काळातील दुष्काळ परिस्थितीची माहिती जाणून घेणे.

**श्री संत दामाजी महाराज यांचे चरित्र :-**

**आजचे मंगळवेढे**

प्राचीन काळांपासून अनेक राजवंशाचा अंमल मंगळवेढा या ऐतिहासीक स्थळांवर असल्याचा दिसतो. कलचुरी शासकाच्या काळात मंगळवेढयास ऐतिहासीक महत्त्व प्राप्त होण्यास सुरुवात झाल्याचा उल्लेख मिळतो. बिज्जल राजाची राजधानी म्हणूनही मंगळवेढयाचा उल्लेख मिळतो.

।। धन्य धन्य ती नगरी। संताची जननी ।।

महाराष्ट्रामध्ये सोलापूर जिल्हयांत मंगळवेढे म्हणून एक तालुका पंढरपूरचे दक्षिणेस १४ मेलांवर आहे. मंगळवेढा नगरामध्ये नगरपालिका, वाचनालय, दिवाणी, कोर्ट, सरकारी दवाखाना, कॉलेज, शाळा पूर्वीच्या चौरबुर्जी किल्ल्यात मामलेदार, कचेरी, खजिना व तुरुंग त्याचबरोबर अनेक ऐतिहासीक स्थळांच्या पाऊलखुणा आज आपणांस पहावयास मिळतात. गावाच्या मध्यभागी नगरपालिकेजवळील चौकात श्री संत चोखामेळा महाराज यांची अलीकडील बांधलेली सुंदर प्रेक्षणीय समाधी आहेत.

**बहामनी राज्य :-**

हसन गंगूचे इ.स. १३४७ मध्ये बहामनी राज्य गुलबर्गा येथे स्थापिले. इ.स. १४२९ मध्ये बिदरला अहमदशहा याने राजधानी आणली. याचवेळी बिदर येथे दामाजी म्हणून एक कारकून दरबारात चमकला. मुसलमानी राज्य बिदरास असल्यामुळे हिंदू लोकांना आपला हिंदू धर्म पाळण्यास फार अडचण पडत होती.

**मंगळवेढयास आगमन :-**

दामाजीपंताची भार्या सावित्रीबाई ही सुध्दा त्यांना अनुरुप अशी साध्वी, सुशील, पतिव्रता होती. ज्याप्रमाणे दामाजीपंतांच्या आई-वडिलांची फारशी माहिती उपलब्ध नाही.

इ.स.१४५० मध्ये दुसर अल्लाउद्दीन बादशाह राज्य करीत असताना त्याचा भाऊ अहमदशाह याने स्वतंत्र होण्याच्या इच्छेने सैन्य जमवून सोलापूरच्या आसपासचा प्रदेश जिंकून घेतला. दामाजीपंताना तहसिलदाराचे अधिकार देऊन सैन्यातही नायबसुभेदाराचे अधिकार देऊन सैन्यातही नायबसुभेदाराचे अधिकार देऊन सैन्याबरोबर पाठविले. या सैन्याने राजपुत्र अहमद शाह याचा पराभव करुन त्यास रायचूरकडे पिटाळून लावीले. व सोलापूर, पंढरपूर, मंगळवेढे, सांगोला, कासेगांव वगैरे सर्व मुलुख पुन्हा अल्लाउद्दीन बादशहाच्या अधिपत्याखाली आला व दामाजीपंतांचे नेमणूक मंगळवेढे ठाण्यास सुभेदार व तहसिलदार म्हणून झाली. दामाजीपंत सावित्रीबाईसह मंगळवेढयास येऊन बाहमनी राज्याचा प्रतिनिधी म्हणून काम पाहू लागले.

मंगळवेढयाच्या दामाजीपंतांचा वाडा, हे वारकरी लोकांचे आश्रयस्थान झाले. दामाजीपंतांनी तहसिलदार झाल्यापासून मंगळवेढयाचा कारभार सुधारला. लोक सुखी व आनंदी झाले. दामाजी पंतांच्या कारभारामुळे प्रजा सुखी व संतुष्ट झाली.

**दुष्काळ व दामाजी पंत :-**

इ.स. १४५८ साली दिवस उजाडला व पावसाने कोठेतरी पडला. दोन वर्षे पाऊस बिलकूल ही पडला नाही. मंगळवेढे व आसपास सर्व मुलुख दुष्काळाच्या खाईत लोटला गेला. पंढरपूर, सोलापूर, सांगोला, विजापूर या सर्व प्रदेशांतील लोकांचा

भूकेने मृत्यू होण्यास सुरुवात झाली. त्यावेळी दळणवळणाची साधनेही फारशी नव्हती. धान्याचा भाव एक रुपयास पायलीवर शेरावर आला पण धान्य मिळेना. लोक पैसा व दागिने घेऊन वणवण हिंडू लागले. दागिने व पैसे घेऊनही कोणी धान्य देईना. त्यांतच गावातील तळी विहिरी आटू लागली. गुरांना पिण्यास पाणी मिळेना. खावयास कडबा मिळेना. लोक अन्नअन्न करुन तडफडू लागले. म्हातारे व मुले यांची फार मोठी दयनिय स्थिती झाली. पण यावेळी चमत्कार असा झाला की, मंगळवेढे गावापुरता पाऊस पडला होता. व तिथेच पिके आली. सरकारी वसुल धान्य रुपाने झाला होता. ६०० खडयांची गंगा व जमुना अशी दोन मोठी कोठारे ज्वारीने भरली होती. दामाजीपंताच्या आश्रयाखाली सुखी लोक होते.

धन्य धन्य तो संत व धन्य त्या दामाजीची परमेश्वर भक्ती
साधु - संत येती घरा, तोची दिवाळी दसरें

अशी म्हण आहे. पण मंगळवेढे येथे तर प्रत्यक्ष दामाजीपंत निवास करीत होते.

जे का रंजले गांजले - त्यासी म्हणे जो आपुले
जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती

खरोखर जे संत असतात त्यांचे अंत:करण लोण्याहून मऊ असते. गरिबांचे अंत: करणे व तळमळ संतच जाणू शकतात. दामाजीपंताचे अंत: करण भरुन आले.

**बादशहाचा हुकूम व अटक :-**

या जगामध्ये सज्जन थोडे पण दुर्जन्य फार आहेत. मंगळवेढयासही दामाजी पंतांच्या कचेरीत काही दुर्जन होतेच. त्यामध्ये एक कृष्णाजीपंत मुजुमदार म्हणून एक प्रसिध्द होते. त्या मुजुमदारास तहसिलदाराची जागा मिळवायची असल्यामुळे दामाजीपंताबद्दल दरबारात चुगली केली व बादशहाचा दामाजीपंतांवर रोष झाला म्हणजे आपणांस तहसिलदाराची जागा मिळेल असे त्यास वाटत होते. सुलतान हुमायुनशा जालीम म्हणून प्रसिध्द होता व त्यात या चुगलीची भर पडली. बादशहाने ताबडतोब दामजीपंतांना पकडून बिदरास आणण्याचा व कृष्णाजीपंत मुजुमदार यांना तहसिलदार म्हणून नेमल्याचा हुकुम पाठविला. दामाजीपंतांनी वाडयात जाऊन सावित्रीबाईस बादशहाचे बोलावणे आले आहे, जाऊन येतो - असे सांगितले. सावित्रीबाई वाडयाबाहेर आल्या व पठाण स्वाराना म्हणाल्या की, दामाजीपंत जेवण करीत आहेत, आपणही त्यांचे बरोबर जाणार आहात तरी थोडे जेऊन घ्या. संकटसमयी सुध्दा हिंदू स्त्रीचा विवेक सुटला नाही व ती योग्य ते आदरातिथ्य करिता याचा हा नमुना आहे. नाही - होय म्हणत पठाण स्वारांनी जेवण केले व सर्वांची निघण्याची सिध्दता झाली.

त्यावेळी दामाजीपंत नगरवासियांना म्हणतात - प्रिय नागरिकहो असे हाताश काय होता, मी काही पाप केले नाही अथवा गुन्हा केलेला नाही. भुकलेल्या मंडळीना धान्य वाटले आहे. माझ्या यात स्वार्थ होता काय ? परमेश्वराच्या ठिकाणी हा गुन्हा होणार नाही. बादशहांने जरी मला शासन केले, तरी पंढरीचा पांडुरंग जो भक्ताचे रक्षण करण्यास सदा सिध्द असतो, तो माझेही रक्षण करील. तुम्ही स्वस्थ चिताने आपआपल्या घरी जा व परमेश्वरचिंतन करा. जनता दामाजीपंतांच्या मागे धावली व हाय हाय करीत रडत माणनदी पर्यंत आली.

**पंढरपूरच्या वाटेवर :-**

दामाजी पंतांना धान्याच्या रसदेचा भरण करण्यासाठी बोलाविले. त्यावेळी त्यांच्याजवळ पुरेसे पैसे नव्हते. म्हणून त्यांना पंढरपूरमार्गे बादशाहाच्या दरबारात हजर करण्यात आले. बादशाहाच्या दरबारात हजर करण्याच्या अगोदरच पंढरीच्या विठ्ठलाने विठू महाराजांच्या रुपात येऊन पैशाचा भरणा केल्याची आख्यायिका आहे. भरणा केलेली व्यक्ती विठ्ठल होता का

विठू महार होता याबद्दल विद्वानांमध्ये मतमतांतर आहे. काहींच्या मते तो पंढरीचा विठ्ठल असावा कारण तसे नसते तर बिदरच्या राजदरबारास त्याला इतके महत्त्व का मिळावे ? तर इतरांच्या मते तो विठू महारच असावा कारण बादशाहने विठू महारास दिलेल्या सनदेत विठू महाराने बिदरच्या दरबारात रसदेचा भरणा करुन दामाजी पंतावर आलेल्या संकटाचे निवारण केले असा उल्लेख मिळतो.

**दरबारांत दामाजीपंत :-**

चार दिवसानी बिदरास पोचले. लगेच दरबारांत बादशहापुढे दामाजीपंतांना मुसक्या बांधून उभे करण्यात आले. तेंव्हा बादशहास पुन्हा विठू महाराची आठवण झाली. दामाजीपंतास तरी विठू महार कोण व कोठे होता हे कोठे माहित होते. त्यांनी सांगितले की, मला विठू महार माहिती नाही व मी त्यास आपणांकडे पाठविले नव्हते.

दामाजीपंत विचार करु लागले व त्यांना साक्षात्कार झाला की भक्ताचे रक्षण करण्यासाठी पंढरीचा माझा मित्र व सखा पांडुरंग हा विठू महाराचे रुप घेऊन येथे आला असेल. भक्ताच्या रक्षणासाठी परमेश्वर धावून आला हा आनंद त्याना झाला, पण परमेश्वरास महाराचे रुप घ्यावे लागले. म्हणून दामाजीपंत कष्टीही झाले. मनातल्या मनात परमेश्वराची प्रार्थना करुन पंढरपुराकडे तोंड करुन त्यांनी हात जोडले.

**निर्वाण - समय :-**

श्री दामाजपंतांनी पुन्हा एकदा मंगळवेढयास येऊन तेथील जनतेस दर्शन घ्यावे असा सारखा आग्रह करीत होते. म्हणून चैत्री वारी संपताच श्री दामाजी पंतांनी मंगळवेढयास येण्याचे कबुल केले. मंगळवेढयाच्या लोकांना फार मोठा आनंद झाला व त्यांच्या सत्काराची त्यांनी मोठी तयारी केली. मंगळवेढा येथील भुईकोट किल्ला इ.स. १४९३ साली बांधला, त्या वेळी यसा कमानीजवळ किल्ल्यांचा जो पश्चिम दरवाजा होता त्यास ''दामाजीचा दरवाजा'' हे नाव त्यामुळेच ठेवले होते. सन १८८७ मध्ये समाधीपुढील मंदिर बांधण्यात आले. व त्या मंदिरात श्री पांडुरंग रखमाई व दामाजीपंतांच्या मूर्तीची स्थापना फाल्गुन शु. ८ शके १८०७ तारीख २८/२/१८८७ रोजी करण्यात आली.

सन १९४४ साली ''श्री दामाजी संस्था'' म्हणून एक संस्था सांगली संस्थानांत रजिस्टर करण्यात आली.

**पुण्यतिथी :-**

त्रयोदशी, चतुर्दशी हे दोन दिवस भजन, किर्तन, नामस्मरणांत घालवावयाचे व वैशाख पोर्णिमेस गुलाल टाकून श्रीसंत दामाजी महाराज यांची पुण्यतिथी साजरी करतात. किर्तन ही प्रथा वारकरी पंथामध्ये पिढयापिढया चालू आहे.

श्रीदामाजी मंदिरावर शिखर बांधून त्यावर ह.भ.प. श्रीमान सोनोपंत दांडेकर यांचे शुभ हस्ते मोठा कळस बसविला आहे. ''श्री संत दामाजी महाराज यांचे चरित्र'' होय. इतिहासातील संत परंपरेतील मंगळवेढयातील प्रमुख संत दामाजीपंत हे भुकेल्यांचे अन्नदाता म्हणून प्रसिध्द होते. त्यांनीच आपल्या संत (शांत) विचाराने फक्त मंगळवेढयातील जनतेचे रक्षण न करता पंढरपूर, सांगोला, विजापूर जो मंगळवेढयाच्या आसपासच्या ठिकाणी राहणाऱ्या सजीवांचे (मानव प्राणी) यांचे धान्याचे कोठार खोलून रक्षण केले. १४६८ ते १४७० हा दुष्काळाचा कालखंड हा त्यामुळेच संत दामाजीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. आजच्या वैज्ञानिक युगामध्ये सुध्दा त्यांचे कार्य मनुष्यजीवास प्रेरणीय आहे. विज्ञानामुळे जो विकास झाला त्या विकासामुळे सोई - सुविधा मनुष्यांना मिळाल्या परंतू संत दामाजी सारख्या महान विचाराच्या संतामुळेच या वेज्ञानिक युगात मनुष्यास शांती मिळती आहे.

**संदर्भ साधने :-**


*१) महिपती भक्ति विजय पोथी - दामाजी चरित्राचा अभ्यास.*

*२) विठ्ठल बाळकृष्ण सरनाईक, दामाजीपंताचे चरित्र - अवृत्ती दुसरी - मुंबई पुरंदरे आणि कंपनी मुंबई १९०४.*

*३) पां. श्री. टिल्लू,भक्त दामाजी - प्रकाशक केशव भिकाजी ढवळे, मुंबई.*

*४) डॉ. दत्तात्रय विनायक पटवर्धन संत दामाजी - किर्तन, प्रकाशन.*

*५) पुरुषोत्तम निळकंठ साठे विठोबाची चोरी - पंढरपूर येथील दामाजी निवासस्थानावर आधारित चंद्रोदय प्रकाशन १९५३.*

*६) सचित्र दामाजीमंदिर, सन १९६३ प्रकाशक श्री दामाजी संस्था.*

*७) केतकर.व्य.श्री. महाराष्ट्र ज्ञानकोश खंड क्र.५, महाराष्ट्र ज्ञानकोश मंडळ १९५६.*

*८) गोपाळ देशमुख, सोलापूर जिल्हयाचा इतिहास (मराठा कालखंड) भाग १, रेवू प्रकाशन २००९.*

*९) सोलापूर जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, १९८९.*




**शितल अशोक फुगारे**
इतिहास विभागप्रमुख , श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.